स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

दिनांक २४/११/२०२२

# अवैध दारु धंदयावर स्थानिक गुन्हे शाखेचे धाडसत्र

यवतमाळ जिल्हयात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरु राहणार नाहीत तसेच अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन व्हावे याकरीता मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केले होते त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी त्यांचे अधिनस्त पथकांना अवैध धंदयाची गोपनिय माहीती काढुन प्रभावी मोहीम राबविणे बाबत सुचना देण्यात आल्यात होत्या.

दिनांक २४/११/२०२२ रोजी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यांना यवतमाळ शहरात गवळीपुरा तलाव फैल, यवतमाळ येथे मोठया प्रमाणात अवैधरित्या हातभटटी दारु काढल्या जाते अशी गोपनिय माहीती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी प्रभावी रेड कारवाई करणे कामी पथक तयार करुन रेड कारवाई करणे बाबत निर्देश देण्यात आले होते.

यासंबधाने आज रोजी पहाटे दारुभटटीतुन अवैधरीत्या दारु काढणारे घटनास्थळाची स्थागुशा चे पथकांनी शहनिशा करुन गवळीपुरा तलाव फैल, येथे धाड टाकली असता मस्जीदचे मागे तलावाचे काठावर इसम नामे रमजान छोटु उचे वय ४५ वर्ष रा. जवाई नगर, तलाव फैल हा दगडांची चुल रचुन त्यावर लोखंडी ड्रम ठेवुन मोहाहातभटटी दारु काढतांना मीळुन आला. सदर घटनास्थळावरुन १) ५० लीटर मोहा हातभटटी दारु २) मोहासडव्याने भरलेले ७० नग रबरी टयुब ज्यात १४००/- लिटर ३) मोहाहातभटटी साहीत्य असा एकुण २,९४,०००/- रु चा मुद्येमाल मीळुन आल्याने आरोपी नामे १) रमजान छोटु उचे वय ४५ वर्ष रा. जावाई नगर, तलाव फैल, यवतमाळ २) हातभटटी मालक ( पाहीजे आरोपी ) नामे खन्नु पिरु रायलीवाले वय ५० वर्ष रा. गवळीपुरा, तलाव फैल, यवतमाळ यांचे विरुध्द पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, सपोनि विवेक देशमुख, पोहवा बंडु डांगे, अजय डोळे, महेश नाईक, रजनिकांत मडावी सर्व स्थागुशा यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली आहे.

24.11.

( प्रदिप परदेशी )
पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.
पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे करीता